## प्रेस नोट दि. ०१/१०/२०२२
## कर्ज देतो असे सांगुन लाखो रुपयांची फसवणुक करणाऱ्या ०३ आरोपींना गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक
## एकुण- १८५ इसमांना फसवल्याचे उघड

सदर प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की, फिर्यादी नामे अमोल माणिकराव पाचपुते, रा. काष्टी ता. श्रीगोंदा, जि.अहमदनगर, यांना त्यांचे हॉटेलचे नुतनीकरणा करिता ५ कोटी रुपयाची आवश्यकता होती. त्यावेळी त्यांची ओळख इसम नामे बालाजी बळीराम घोडके वय अंदाजे ३२ वर्षे रा. यवत पोलीस स्टेशन मागे ता. दौंड, जि. पुणे याचे बरोबर झाली होती. त्यानंतर त्याने तसेच संग्राम यादव, रा- कोल्हापुर व मुजावर फायनान्सचे मालक यांनी फिर्यादी यांना ५ कोटीचे कर्ज काढुन देतो म्हणुन प्रोसेसिंग फीचे नावाखाली व ॲडव्हान्स हप्ता म्हणुन असे मिळुन एकुण २,४५,०००/- रुपयाची फसवणुक केल्याने वाकड पोलीस ठाणे, गु.र.नंबर-८००/२०२२ भा.दं.वि.कलम-४२०, प्रमाणे गुन्हा दाखल होता.

मा. पोलीस आयुक्त, सो, अंकुश शिंदे यांनी सदरच्या गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांचे कडे वर्ग केला. तेव्हा मा. पोलीस आयुक्त, सो, श्री. अंकुश शिंदे यांचे तसेच मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मच्छिंद्र पंडीत व पोलीस अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा तपास सुरु केला.

गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी दाखल गुन्हयातील आरोपी नामे **१) बालाजी उर्फ एकनाथ बळीराम घोडके वय-३२ वर्षे रा. ए/३०३ आनंदग्राम सोसायटी यवत ता. दौंड जि. पुणे,** याचा शोध घेवुन त्यास यवत येथुन ताब्यात घेवुन अटक केली. तसेच **आरोपी नामे २) संग्रामसिंह अरुणराव यादव, वय-४६ वर्षे, रा. अरुणोदय रेसीडेंन्सी, फ्लॉट नं २३/६/४ वार्ड हिंमत बहादुर परिसर ताराबाई पार्क कोल्हापुर ४१६००३ व ३) राजविर ऊर्फ हसन अगबर मुजावर, वय- ३० वर्षे, रा. कसबा बावडा जय हिंद पार्क, ५४४/१** बंगला **नंबर-०४, कोल्हापुर ४१६००३** यांना कोल्हापुर येथुन ताब्यात घेवुन त्यांना अटक केली आहे.

सदर आरोपींकडे केलेल्या तपास त्यांचे कडुन एकुण १८५ विविध बॅकांचे कोरे तसेच रक्कम असलेले चेक तसेच कर्ज काढण्या सबंधित कागदपत्रे, मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. तसेच सदरचे तिन्ही आरोपी सद्या पोलीस कस्टडी मध्ये असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे. सदर आरोपींन विरुद्ध पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असुन इतरत्र ही त्यांनी अनेक लोकांची फसवणुक केली असल्याने आणखी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

**सदर गुन्हयातील आरोपी हे त्यांचे कडे कोणत्याही प्रकारचे फायनान्स करण्याचे लायसन्स नसताना मोठया रक्कमेच्या कर्जाची गरज असणाऱ्या लोकांना कोटयावधी रुपयांचे कर्ज काढुन देतो असे सांगुन त्यांचे कडुन कर्ज काढण्यासाठी लागणारी प्रोसेसिंग फी म्हणुन व ॲडव्हान्स हप्ता याचे नावाखाली लाखो रुपये घेवुन लोकांची फसवणुक करत असल्याचे उघड झाले आहे. अशा प्रकारे अजुन कोणाची फसवणुक झालेली असेल तर आपण गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड येथे संपर्क करावा ही विनंती.**

---

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. अंकुश शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे डॉ. काकासाहेब डोळे सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडीत, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर, पोलीस उपनिरीक्षक गणेश रायकर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, संजय गवारे, पोहवा/ प्रविण दळे, अदिनाथ मिसाळ, रोहिदास आडे, पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ तुषार काळे, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, तसेच तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, राजेंद्र शेटे, नागेश माळी, पोपट हुलगे यांनी केली आहे.**

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे
पिंपरी चिंचवड